RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ११२] गुरुवार, जुलै २३, २०२६/श्रावण १, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४१२**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ जुलै, २०२६.

### अधिसूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम.**

क्रमांक बीपीटी-२०२५/प्र.क्र.११८/कार्या-१५.—महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, (१९५० चा २९) याच्या कलम १ च्या पोट-कलम (४) मधील पहिल्या परंतुकाअन्वये, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र शासनाने, प्रस्तावित केलेल्या पुढील अधिसूचनेचा मसुदा, त्यामुळे बाधित होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी, उक्त अधिनियमाच्या कलम १ च्या पोट-कलम (४) मधील दुसऱ्या परंतुकाद्वारे, आवश्यक असल्याप्रमाणे प्रसिद्ध करीत आहे ; आणि याद्वारे, अशी नोटीस देण्यात येते की, उक्त प्रारूप, दिनांक २४ ऑगस्ट २०२६ रोजी किंवा त्यानंतर, महाराष्ट्र शासनाद्वारे विचारात घेण्यात येईल.

२. उक्त प्रारूपाच्या बाबतीत, उपरोक्त दिनांकापूर्वी, कोणत्याही व्यक्तीकडून, प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना जे आक्षेप व सूचना प्राप्त होतील, असे कोणतेही आक्षेप किंवा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### अधिसूचनेचा मसुदा

क्रमांक बीपीटी - २०२५/प्र.क्र.११८/कार्या-१५.— महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, (१९५० चा २९) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १ च्या पोट-कलम (४) मधील पहिल्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, असे निदेश देत आहे की, निंबकर कृषी संशोधन संस्था, तांबमाळ, फलटण - लोणंद रस्ता, पोस्ट ऑफिस बॉक्स ४४, फलटण - ४१५ ५२३ ही उक्त अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था असून तिचा नोंदणी क्रमांक एफ-००००७३ (एसटीआर) आहे, तिला **शासकीय राजपत्रात** ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून, उक्त विश्वस्तव्यवस्था तिच्या मुख्य उद्देशामध्ये कोणताही बदल करणार नाही या शर्तीच्या अधीन राहून अंशदानाचे प्रदान करण्यासंदर्भातील, उक्त अधिनियमाच्या कलम ५८ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींपासून कायमस्वरूपी सूट देण्यात येत आहे आणि ती,

(एक) विश्वस्तव्यवस्था, अशा सूट देण्यात आलेल्या रकमेचा विनियोग तिची मुख्य उद्दिष्टे साध्य करण्यासाठी करील; आणि

(दोन) प्रत्येक आर्थिक वर्षाचा तिचा वित्तीय अहवाल ३० जून पूर्वी, धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाकडे सादर करील आणि त्याची प्रत विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना देईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दिलीप शि. घुमरे,**
शासनाचे प्रधान सचिव व विधि परामर्शी.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 23rd July, 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PUBLIC TRUST ACT.

No. BPT-2025/C. R. No. 118/D-XV.—The following draft notification which the Government of Maharashtra proposes to issue under the first proviso to sub-section (*4*) of section 1 of the Maharashtra Public Trusts Act (XXIX of 1950), is hereby published as required by the second proviso to sub-section (*4*) of section 1 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the day of 24th August, 2026.

2. Any objections or suggestions, which may be received by the Principal Secretary and Remembrancer of Legal Affairs to the Government of Maharashtra, Law and Judiciary Department, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft before the aforesaid date, will be considered by the Government.

*DRAFT NOTIFICATION*

No. BPT - 2025/C.R.No.118/D-XV.— In exercise of the powers conferred by the first proviso to sub-section (*4*) of section 1 of the Maharashtra Public Trusts Act (XXIX of 1950) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra hereby directs that the Nimbkar Agricultural Research Institute, Tambmal, Phaltan-Lonand Road, P. O. Box 44, Phaltan - 415 523, Public Trust registered under the provisions of the said Act, having its registration No. F-0000073 (STR), shall, with effect from the date of publication of this notification in the *Official Gazette*, be exempted permanently from the provisions of sub-section (*1*) of section 58 of the said Act, regarding payment of contribution subject to the condition that the said trust shall not make any change in its main object and shall,

(*i*) utilize such exempted amount to the attain the main objects of the trust; and

(*ii*) submit its financial report before 30th June for each financial year to the office of the Charity Commissioner, Maharashtra State and endorse its copy to the Law and Judiciary Department, Mantralaya, Mumbai 400 032.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DILIP SHIVAJIRAO GHUMARE,
Principal Secretary and Remembrancer
of Legal Affairs to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.